# सुधीर गाडगीळांचे 'मानाचं पान' उलगडले

**पुणे, दि. १७ (प्रतिनिधी)** - देशाची सांस्कृतिक राजधानी या ओळखीबरोबरच खवैयेगिरीसाठीही पुणे शहराची ओळख जगभर आहे. नामांकित राजकारणी, सिने कलावंत नेमकं काय खातात? हे जाणून घ्यायला रसिकांना नेहमीच आवडते, नामवंतांच्या खाण्यापिण्यातील आवडी - निवडींची चर्चा करत, काय आणि कसे खावे यांचे सल्ले देत शुक्रवारी प्रसिद्ध निवेदक सुधीर गाडगीळ यांचे 'मानाचं पान' उलगडले.

चपराक प्रकाशनच्या वतीने गाडगीळ लिखित 'मानाचं पान' या पुस्तकाचे प्रकाशन जगन्नाथ शेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी अर्थतज्ज्ञ अणि खाद्यपदार्थांचे जाणकार प्रा. प्रदीप आपटे, बुद्धिबळपटू अभिजित कुंटे, प्रकाशक घनश्याम पाटील, मंदार जोगळेकर उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रा. आपटे म्हणाले, जगात खाण्यावर लिखाण करण्याचे धाडस फार कमी लोक करतात. विशेषत: खाण्याविषयीचा इतिहास जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता असे दिसते की इतिहासाचा ठेवा म्हणून ज्याकडे बघता येईल, असे लिखाण एक हजारपेक्षा जास्त लेखकांनी केले नाही. 'लिळा चरित्रात' चक्रधर स्वामींना काय आवडायचे याचा उल्लेख आहे, तर 'ज्ञानेश्वरी'च्या

## सेलिब्रेटींच्या आहारावर पुस्तकाचे प्रकाशन

अनेक अध्यायात संत ज्ञानेश्वरांनी खाण्याच्या पदार्थांच्या माध्यमातून दृष्टांत दिला आहे. मध्ययुगीन काळानंतर एकोणिसाव्या शतकात प्रसिद्ध लोकांच्या खाण्या-पिण्याच्या आवडी विषयी लिखाण झालेले नाही. आज मोठ्या हॉटेल्समध्ये काही जुन्या पदार्थांना नव्याने सजविण्यात आल्याचेही पहायला मिळते, असे सांगितले. तसेच इतर लोक काय खातात? या उत्सुकतेमधूनच खवय्येगीरी घडत जाते, असे त्यांनी नमुद केले.

हॉटेलात खाणं आणि सिनेमा बघणं हे एकट्याने करायची गोष्ट नसल्याचे सांगताना गाडगीळ म्हणाले, खाणे आणि चविष्ट असणे यात फरक असतो. तसेच खाण्याच्या निमित्ताने रंगणाऱ्या गप्पा हाही एक वेगळा विषय असतो. खाण्याविषयी बोलणारी चविष्ट माणसे आपल्या आयुष्यात आली. आजही आम्ही काही लोक फक्त खाण्यासाठी म्हणून भेटतो. अनेक सेलिब्रेटींविषयी लोकांना जाणून घेण्याची इच्छा असते, हे समजले म्हणून 'मानाचं पान' चा प्रपंच केल्याचे गाडगीळ यांनी सांगितले.